ई साहित्य प्रतिष्ठान®

# पक्ष्यांना रंग कसे मिळाले?

-अनघा हिरे







पुस्तकाचे नांव : पक्ष्यांना रंग कसे मिळाले

लेखिका : अनघा हिरे

मुखपृष्ठ व सजावट : अमृता ढगे

आतील चित्रे : अनघा हिरे

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

ई-टर्निटी, ११वा मजला

ईस्टर्न एक्सप्रेस हायवे

ठाणे, ४००६०४

esahity@gmail.com

©2012 : अनघा हिरे

anagha.hiray@gmail.com

ph. 9422284116

# गोष्टींचा क्रम

....आणि पक्षांना रंग मिळाले

कोकीळेचे गुपीत

कावळयाची लेक

.............आणि पक्षांना रंग मिळाले

जादुचे जंगल,

जादुचे झाड,

जादुचे पाणी

असं कधी ऐकलंय का?

पण आमच्या पक्षांच्या बाबतीत असच काही घडलं

आणि त्यांच सारं जगच बदललं.

खुप वर्षांपुर्वी पक्षांना मुळी रंगच नव्हते.

ते सगळे आपले पांढरे शुभ्रच होते.

खटयाळ साळूंकी

पांढरी शुभ्र

गेली एकदा आपले जंगल सोडून .

खुप दिवस दुसऱ्या जंगलात हिंडली फिरली

पण तिथे तिला करमेनाच.

जुने मित्र जुने सवंगडी सगळे आठवले

आठवणीने बेजार झाली

विचार केला जावे परत आपल्या जंगलात

परक्या जंगलात किती दिवस रहावे

शेवटी आपले घर ते आपलेच असते.

आपल्या घराची सर नाही येत महालाला

कसं ही करावं आणि आपल्या घरी परत जावं.

निघाली मग उडत उडत

एक जंगल

दोन जंगल

असे कितीतरी जंगलं ती पार करत होती.

परतीचा प्रवास होता मोठा,

विचार केला जरा घ्यावा विसावा.

थोडीशी न्याहारी करावी, पाणी प्यावे,

पाण्यात खेळण्याची मजा लुटावी

खुप फळे खाल्ली,

खुप खेळली

बागडली

अचानक हे काय झाल?

अंगावर हा रंग कसा चढला?

पाण्यातच स्वतःला बघितले

सुंदर रुप बघुन लाजु आले.

मग निघाली परतीच्या जंगलात

एक जंगल

दोन जंगल

असे किती तरी जंगल तिने पार केले.

पण संध्याकाळ होण्याच्या आत आपल्या घरी परत आली.

लांबुनच साळूंकीला येताना बघुन सगळे मित्र मैत्रिणी जमले.

अगं साळूं

किती गं सुंदर दिसतेस तु,

किती गं सुंदर तुझी चोच,

किती गं सुंदर तुझे पंख,

किती गं सुंदर तुझे पाय,

किती तारीफ करु आम्ही तुझी ?

रुप सुंदर घेऊन आली कुठून?



साळूंकी पण वर्णन करुन करुन थकली.

तुम्हाला पण यायचं कारे तिथे?

हवा असा सुंदर रंग तुम्हाला?

मग उद्या सकाळी लवकर उठा,

आपण जाऊ त्या लांबच्या जंगलात

आणि तिथले मजेशीर फळ खाऊ या.

सगळयांना आनंद झाला.

आणि सकाळ कधी होणार याची आतुरतेने वाट लागले बघायला.

पहाट होण्याच्या आत

सगळे निघाले

मग साळुंकी पुढे पुढे

आणि तिचे सगळे सवंगडी मागे मागे.

एक जंगल

, दोन जंगल

असे कितीतरी जंगलं त्यांनी पार केली.

मग आलं की जादुचं जंगल.

तिथे होती छानशी झाडं.

त्यांना लागली होती छानशी फळं.

अगदी साळूने वर्णन केल्या प्रमाणेच.

रंगी–बेरंगी.

तिथे अजुनही खुप होत्या छानछान गोष्टी,

अगदी साळूने वर्णन केल्या प्रमाणे.

चमकणारे डोंगर,

झरे, नदी तलाव

छानशी. माती रंगीत

खुप काही होतं.

अगदी साळूने वर्णन केल्या प्रमाणेच.

हे रंगी बेरंगी जग बघुन सगळयांना खुप आनंद झाला

ते पण साळू सारखेच तिथे खुप रमले.

छान छान फळ खाल्ली

पण हे काय आज कसा कोणालाच रंग चढला नाही.

काय गं साळू,

आम्हाला कसा रंग नाही आला गं अजुन !

अनुभवी साळू हसुन म्हणाली

अरे असा कसा येईल फळ खाऊन रंग,

त्या जादुच्या तलावात जाऊन जरा अंघोळ करा.

मग तुम्ही ज्या रंगाची फळे खाल्ली तोच रंग येईन तुम्हाला.

आपण कोणती फळे खाल्ली कोणाला काय लक्षात.

साळूच्या सांगण्यावरुन सगळे गेले आपले पाण्यात बागडायला.

मग काय मजा झाली.

सगळयांना रंग मिळाले.

ए तु कसा दिसतोस,

ए तु कशी दिसतेस

म्हणून सगळे कलकलाट करु लागले.



अरे

पण हे काय झालं कावळयाला अन कोकिळेला ?

ते का उदास झाले?

त्यांनी फक्त करवंदेच खाल्ली होती

त्यामुळे त्यांना फक्त करवंदाचाच रंग मिळाला.

पोपटाने हिरवागार पेरु अन लाल लाल चेरी खाल्ली,

कबुतराने तर जांभळं काय अन जे दिसेल ती फळ खाल्ली.

मोराने आपली फळे कमीच खाल्ली

पण रंगीबेरंगी दगडावर तो नाचतच बसला.

अशी बऱ्याच जणांनी वेगवेगळया रंगाची फळ खाल्ली.

अन छान छान रंग मिळाले पण कावळा अन कोकीळेच काय? ते बिच्चारे तर रडूच लागले.

खुप रडले,

खुप रडले

त्यांच रडू काही थांबेचना.



आपल्या हया छानश्या जंगलात कोण बर रडतय

म्हणून देवबाप्पा बघायला आला

तर त्याला हे खुप सारे पक्षी दिसले.

अरे ! तुम्ही का बरे रडताय ?

तुम्हाला इथे नाही का आवडलं.

काय सांगू देवा आमच दुःख

हा असला काळा रंग घेऊन आम्ही आमच्या जंगलात कसे जाऊ ?

आमचा मित्र बगळा म्हणाला होता

“आपला रंग जसा आहे तोच छान दिसतो.

उगाच साळूच्या नादी लागू नका

पण आम्ही काही त्याच ऐकलच नाही.

आता आम्ही काय करु?

त्याला तोंड कसे दाखवु

देवा आम्ही परत दुसऱ्या रंगाची फळे खाऊ कां?

नाही रे बाळा,

आता तलावात अंघोळ केली ना तुम्ही,

आता नाही रंग बदलणार,

आणि हा रंग सुध्दा छान दिसतो तुम्हाला.

अरे आता तरी रडनं थांबवा

मी तुम्हा दोघांना एक एक गंमत देतो.

कावळोबा

तुम्हाला समजणार कोणाकडे पाहुणे येणार.

त्यांना ही बातमी आधीच जाऊन सांगायची हं

आणि दुःखाच्या ठिकाणी सुध्दा तुझाच पहिला मान हं

तु पहिला घास खाल्ल्या शिवाय कोणी नाही जेवणार.

आणि कोकिळदादा

तुम्ही खुप रडले

म्हणून हया दिवसांची

म्हणजेच वसंत ऋतुची

तुला चाहुल लागल्यावर

तु सुंदर गाण म्हणायला लागशिल

तुझ्या गाण्याने तु सर्वांना मोहून टाकशिल.

पुढच्या आयुष्यात हया सुंदर रंगाबरोबरच आता तुम्ही आनंदाने रहाल आणि तुमच्या मुळे सगळयांना आनंदी कराल.

सगळयांनी देबाप्पाचे आभार मानले.

सगळे खुपखुष झाले

आणि आपल्या परतीच्या प्रवासाला लागले.

एक जंगल,

दोन जंगल,

असे किती तरी जंगल त्यांनी पार केली

आणि संध्याकाळ होण्याच्या आत आपल्या घरी आनंदाने

रंग आणि खुशी बरोबर घेऊन गेली.



2) <u>कोकीळेचे गुपीत</u>

जादुचे जंगल,

जादुचे पाणी,

जादुचा झरा आणि जादुचा तलाव

अशा जादुच्या जंगलातुन रंग आणि खुशी घेऊन सारे पक्षी आले.

समदु:खी कावळीन अन कोकीळेची जास्त गट्टी जमली.

जादुच्या जंगलातला प्रवास दोघींनी बरोबर केला होता नां !

शिवाय आपला रंग बघुन दोघी सारख्याच दु:खी झाल्या होत्या.

अन देवबाप्पाने सुध्दा दोघींनांच छान वरदान दिलं होत त्याच काय!

वरदान मिळाल्यावर दोघींच आयुष्य फार बदलूनच गेल

रंग बघुन जादुच्या जांगलात आल्याच त्यांना जेवढ दु:ख झाल होत

त्याच्या कित्येक पट आनंद त्यांना वरदान मिळाल्याचा झाला.

कावळीन अन कोकीळा अगदी जिवलग मैत्रिण झाल्या.

दोघींची एकी जंगलात भारी गाजू लागली

त्यांच्या काळेपणावर कोणी बोलूच शकले नाही.

सहज जर कोणाला आली हुक्की

हया दोघींना चिडवण्याची

तर टपलीत चांगली चकचकीत चोच बसत.

दिवसा कावळे परिवाराने किती ही गोंधळ घालून

जंगल डोक्यावर घेतलेलं असलं

तरी संध्याकाळी कोकिळेच्या गाण्याने

सगळे शांततेत एकत्र बसत.



झाल मग एकदा कोकिळेचे गाणं संपल

कि दिवसभरात काय काय झाल

हे सगळयांना आपल्या मित्र मैत्रिणींना एकाच वेळी सांगायच असायच.

हा कलकलाट व्हायला सुरवात व्हायचा

तो संपायचा तो सुर्यमावळल्या नंतरच.

जंगलात इतरांचे ही जीवन आनंदातच होते.

रंग मिळाल्यापासून सगळयांना भटकायची भारी सवय लागली होती.

आज सकाळी सकाळी चिमणराव चिमणीला म्हंटले

‘अग येतेस का वडाच्या झाडा जवळ

छान छान लाल फळ खाऊ

आणि खड्यात साचलेल्या पाण्यात खेळून बिळून येऊ.

चिमणीने साफ नकार दिला

नाही जमणार

तुम्हीच जाऊन या इथे अंडयांकडे कोण लक्ष देईन.

बराच वेळ झाला

चिमणोबा परत आलाच नाही.

तर आपल एखाद काम

शेजारधर्म म्हणुन शेजाऱ्याला सांगुन बघाव

अस म्हंटल तर कावळोबा भारी भाव खायला लागला.

अरे बाबा जा र तुझे पंख मोठे आहे

तु जरा भरभर बघुन येशील हयांना

तर कसल काय

बर झाले तेवढयात चिमणराव आपले धापा टाकत आले.

चिमणीने चांगल दरडाऊन विचारल

चोच लहान आहे

मग फळ आणण्याची काय गरज होती.

त्या वजनाने आपल भर भर उडता सुध्दा येत नव्हता ना,

मला अंडयाकडे लक्ष द्यायचे होते ना.

नाही तर मी आलीच असती तुमच्या बरोबर.

झाला तुझा चिवचिवाट

आता घे हे फळ तुझ्यासाठीच आणलं ना!

चिमणीबाईला आणलेलं फळे

जरा चाखुन बघतो

म्हणून कावळोबाने उगाच मध्ये तोंढ घातल

अणि चिमणीबाईचा जो त्याच्या भोवती चिवचिवाट सुरु झाला.

तर तो उडूनच गेला.



पोपटरावांनी अन कबुतररावांनी

आपआपल्या मोठया मोठया शाळा उघडल्या होत्या

त्यांच बघुन बगळयांनी पण

आपला एक ग्रुप तयार केला

मग सारे आपआपल्या ग्रुपनेच हिंडायला जायचे.

ग्रुपमध्ये राहूनच

सगळे आपल्या अंडी पिल्लांकडे लक्ष द्यायचे

त्यामुळे काही विशेष चिंता कोणालाच नसायची.

श्री व सौ गरुडांच बरय

पल्लांकडे लक्ष ही ठेवतात

अन मस्त आकाशात फेरफटका मारुनही येतात.

पण बाकीच्यांच तस नाही हं

सगळयांना आपआपल्या अंडयांकडे लक्ष द्यावच लागत.

घर सोडून बाहेर पडायची काही सोयच नव्हती.

पण कोकीळेनी आपली चांगलीच सोय करुन घेतली

त्याच काय झालं.

आज सकाळपासून कावळा अन कोकीळ

कोणत्या विषयावर एवढया चर्चा करत होते

कोणास ठाऊक

मग थोडया भटकून आलेल्या कावळीन अन कोकीळापण

त्यांच्या चर्चेत सामील झाल्या.

बाकीच्या पक्षांना हे काय नविन नव्हतं.

हया चौघांची नेहमीच कुठल्यान कुठल्या कारणावरुन

चर्चा व्हायच्या.

अरे पण आज चक्क पैकी ते भांडत होते.

काकोमध्ये भांडण चाललय

सगळी जंगलभर वार्ता पसरली

पण प्रत्येकाला आपआपली कामं होते.

त्यांच्याकडे कोण लक्ष देणार

कोणाला झोके खेळायचे होते.

कोणाला पाण्यात बागडायच होतं.

कोणाला आकाशात भरारी मारायची होती.

कोण फळ खाणार होते.

कोणाला अशाच टिवल्या बावल्या करत फिरायचं होत

प्रत्येकाला आपले इतके कामे होत

की हयांच्याकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नव्हताच.





हं पण एवढ भांडण होतय

तर चर्चेचा मुद्दा तरी कोणता आहे

तर कोकीळ आपल एकलत एक अंड

दोन्ही पंखात पकडून डोक्यावर घेऊन आला होता.

आता कोकीळ च म्हणण अस होत की

मला गाण म्हणत सगळीकडे फिरायच आहे

कावळीन आपली रिकामीच असते तर काय हरकत आहे.

कावळीनीने एक अंड एक सांभाळायला.

कावळोबा चक्क नकार देत होता.

पण कावळीनीला काही हरकत नव्हती.

किती ही झाल्या तरी जीवाभावाच्या मैत्रिणी त्या

‘भला एक अंडा संभालनेमे उसका क्या जायेगा’

ती तर तिची ना हरकत दाखवत होती

पण कावळोबा नेहमी सारख्या आखडूनच

भाव खाण्याचा कार्यक्रम करत होता.

नाही

हो, नाही

हो

हया प्रकरणात कोकी आपल अंड घरटयात ठेवत होती

अन बाहेर काढत होती.

काऊने पण डोळयाने खुनावल

दोघींचे इशारे झाले.

एक वेळेस अस झाल कोकी ने

तर फक्त अंड उचलण्याची ॲक्शन केली

आणि मी चालले म्हणून निघून गेली.

तीच्या पाठोपाठ कोका पण उडून गेला.

कावळोबाला वाटल आपणच जिंकलो.

तो पण अभिमानाने आपल्या अंडयाकडे बघु लागला.

काऊताईने सुध्दा त्याच्याकडे चोच वर करुन बघितलं

''किती रे शहाणा आहेस तू''

झाली गंमत

अळीमिळी गुपचिळी

माहिती आहे फक्त कावळीनीला

अन कोकीळेला.



## 3) कावळयाची लेक

सकाळ झाली
कावळोबा आळोखे पिळोखे देऊन उठला
त्याने पहिले
आपल्या अंडयांकडे एक नजर फिरवली
कावळयाने हसत मुद्रेने विचारले
काय मग काय म्हणतात आमचे राजकुमार
अंडयातुन बाहेर यायच आहे कि नाही त्यांना.
काऊ सुध्दा लाजुनच कावळोबाकडे बघत म्हणाली
अजुन वेळ आहे हो त्यांना बाहेर यायला.
किती घाई झाली आहे तुम्हाला.
कावळोबा सतत आपल्या अंडयांच्या आसपासच वावरत
अन आपल्या येणाऱ्या पिल्लांची वाट बघत

तो खुप आतुर झाला होता.

अंडयातुन बाहेर पडणारे छोटे छोटे गोंडस पिल्लू

कधी आपल्याला बघायला मिळेल.

आपण त्यांना दाना कधी भरवू

त्यांना बोलायला कधी शिकवु

त्यांना उडायला कधी शिकवु

याचे तो सतत स्वप्न बघत बसायचा.

कावळोबा कावळीनिला म्हणाला

पिल्लांना आपण कधीच एकट सोडायच नाही

एक तर तु तरी घरटयात रहायच

नाही तर मी तरी राहीन.

दोघांनी एकदम बाहेर जायचच नाही.

इतक्या उत्साही आपल्या नवऱ्याला

आता आपण काय सांगणार

ठिक आहे बाब

तुम्ही जस म्हणाल तसच करुया.

आज सकाळी सकाळी काऊ कावळोबाला म्हणाली

शेजारच्या गांवात जरा फेरफटका मारुन या

तिथे आपले खुप नातेवाईक आहेत.

त्यांना भेटून या

गावाकडचा समाचार घेऊन या.

त्यांना थोडी आपल्या सारख मोकळ वातावरण मिळतय तिथे.

त्यांना इथे रहायलाच आवडत नाही.

किती काही झालं तरी शहरातली ती

त्यांना काय आवडणार आपल्या जंगलात.



खरय काऊ तुझ

अगं मागच्या वेळेस मी गांवाकडे गेलो होतो

काय ऐशाआरामात राहतात ग ते तिथे.

ते कुठे कुठे हिंडतात फिरतात.

मोठया मोठया घरांवर

लांब लांब तारांवर

मोठया मोठया मैदानांवर.

ते नाही घाबरत कुणाला.

ग्रुपने जाऊनच ते जेवणावर ताव मारतात.

हे ग्रुपने आले की, बाकीचे लोकच त्यांना घाबरतात.

अन खातात पण भारी भारी पदार्थ गं.

आपल्याला कधी बघायलाही मिळत नाही तसल जेवण.

पण आपल्या जंगलात जो आनंद आहे तो नाही येत शहरात.

जाऊ द्या हो

तुम्ही फक्त फिरुन या

कंटाला आला कि या आपले परत.

आपल्या चारही अंडयांकडे प्रेमाणे बघुन

कावळोबा निघाला शहराकडे जायला.



चांगले दोन जंगल पार केले

आणि पोहोचला आपल्या नातेवाईकांकडे.

नातेवाईकांना भेटला

छान छान मेजवान्या हाणल्या

अन खुप खुप फिरला.

दोन दिवसातच

त्याला आपल्या घरटयाची,

आपल्या अंडयांची

आपल्या काऊची आठवण यायला लागली.

आता काही दिवसांनी माझ्या पिल्लांना

बघायला या हं. आपल्या जंगलात

असे सांगुन

नातेवाईकांचा निरोप घेऊन

कावळोबा निघाला आपल्या परतीच्या प्रवासाला.

चांगले दोन जंगल पार केल

आणि पोहोचल

आपल्या जंगलात

आपल्या घरटयापाशी आल्यावर बघतो

तर काय

अंडयातुन छोटुकले पिल्लं बाहेर आले होते

चांगले चार.



आपली मुल कशी अगदी बापासारखी दिसताहेत

फक्त हया तिन भावांची ही लहान बहीण

ती फक्त काऊ सारखीच नाजुक छोटी दिसतेय.

काऊच्या जवळ येऊन कावळोबा काऊला म्हणाला

अगदी तुझे रुप घेऊन जन्माला आली गं माझी लेक.

काऊ पण मनातल्या मनात हसली लाजली.



आज काऊ अन कावळोबाच्या घरी चार पिल्ल झाली
ही बातमी सर्व जंगलभर पोहोचली
सर्व सवंगडी बाळांना बघायला आली.
माझे राजबिंडे मुलं थोडे मोठे झाले
की मी तुम्हा सगळयांना मोठी पार्टी देईन.
कावळोबाच्या बोलण्याने सगळे खुपच खुष झाले.

आज पिल्लांना बघायला कोकिळ अन कोकिळा आले होते.

खुप वेळ कावळोबाच्या घरी थांबले

त्यांनी कावळीनिला खुप फळ आणुन दिली.

चौघेजन खुप खुष होती.

कोकीळ आपली सहज पिल्लांना हात लावायला गेली

तर कावळोबा व्हसकन तिच्यावर ओरडला

‘अजुन लहान आहे ना पिल्लू

त्यांच्या जवळ नको जाऊ’

कावळोबा अन कावळीन

पिल्लांची खुप काळजी घेत.

पिल्लांना छान जेवण आणुन देत.

पिल्ल सुध्दा आपल्या घरटयातच बसुन रहात.

कावळा कावळीन त्यांना कधीच एकटं सोडून जात नसे.

सगळ अगदी ठरल्याप्रमाणेच होत होत.

दिवसामागून दिवस जात होत.

पिल्लू हळू हळू मोठे होऊ लागले.



सकाळी सकाळी

कावळोबाने आपल्या चारही पिल्लांना गदागदा उठविले

चला मुलांनो

आता आज आपल्याला उडायचे आहे.

डोळे मिचमिच चोळीत सगळे उठले.

बाबांच्या मागे सगळे हळू हळू उडायला लागले.

उडायची त्यांना भारी आवड निर्माण झाली

हळू हळू सगळे उडण्यात तरबेज झाले.

उद्या पासून सगळयांची शाळा सुरु होईन.

सगळयांनी आपल्याला हव तस बोलायला शिकायच आहे.

सगळयांनी सकाळी सकाळी उठायच

मी स्वत: तुमचा अभ्यास घेणार आहे.

कावळोबाने मुलांना बजावल. आहे

पण आपण आधी आपल्या मित्रांना एक पार्टी देऊ

मग मुलांची शाळा चालू करा तुम्ही.

काऊच म्हणण सुध्दा कावळोबाला पटल.

ठिक आहे

कोकीळच्या मदतीने मी पार्टीच्या तयारीला लागतो.

दोन दिवस

कावळोबा पार्टीची तयारी करत होता.

कोकीळ पण त्याला खुप मदत करत होता.

त्यांनी नदीकाठचा एक खेकडा पकडून आणला.

मग एक मोठा बेडूक, र

स्त्यात सापडलेला मोठा उंदीर,

नदीवर एक गिरकी घेऊन मोठा मासा

असे बरेच पदार्थ त्यांनी मेजवानीत ठेवले होते.

आपल्या शाकाहारी मित्रांची पण त्यांनी चांगलीच सोय लावली होती.
शेजारच्या जांभळाच्या झाडाचे ढिगभर जांभळ,

मोठे मोठे सात आठ पेरु लाल लाल चेरी,

वडाच्या झाडाची खुप फळे

असे बरेच काही त्यांनी जमा केले.

ठरल्या दिवशी पार्टीला कावळोबाने

जंगलातल्या सगळया पक्षांना बोलावले

तसेच शेजारच्या गावातल्या नातेवाईकांना

सगळयांनाच बोलावले

सगळयांनी मेजवानीवर मनसोक्त ताव मारला.



सर्व पक्षांनी गाणे म्हंटले

कार्यक्रमाच्या शेवटी कोकीळा आपले गाणे म्हणणार होती.

जेंव्हा कोकीळेची गाणे म्हणण्याची वेळ आली

तेंव्हा सगळे शांत होऊन

तिचे गाणे ऐकण्यात मग्न झाले होते.

कावळा कावळीन सुध्दा

आपल्या पिल्लांना घेऊन गाणे ऐकायला बसले.



कोकीळेच गाणे जस जसे रंगात येत होते

तस तसे कावळीनीची मुलगी, आनंदी होत होती

आणि ती सुध्दा आनंदाने गायला लागली

पण हे काय झाले

कावळोबाची मुलगी कोकी सारखी कशी गाते.

सगळे जन आश्चर्याने बघायला लागले.

बघता बघता कोकिळ उडू लागली

अन कावळीनीची मुलगी सुध्दा तिच्या मागे उडू लागली.



हे काय झालं

म्हणजे त्या दिवशी कोकीने तिच अंड

तिच्या घरी नेलच नव्हत

ते अंड कावळोबाच सांभाळत होता.

कावळीनीच अन कोकीळेच गुपीत

सगळयां समोर फुटलं

कावळोबा आपला संतापुन

कोकीळेच्या मागे लागला

पण सर्व पक्षांनी त्याला खुप समाजावल.

काऊ ताई समोर आली

अन कावळोबाला म्हणाली

तुमची तर लाडकी लेक आहे ना. ती

मग कशाला चिडता आपलच लेकरु आहे ते.

कावळोबा पण लेकीच्या आठवणीने शांत झाला.



esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान ®

www.esahity.com